DIS/302875/2024

श्री.निवृत्ती शंकर घोडे, सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक(विज्ञान) जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर, जि.अहमदनगर यांना जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करणेबाबत.

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्रमांक कार्या-2/खाचौ/65/2024
अहमदनगर दिनांक- / /2024
15/07/2024

वाचा:- 1.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/050222/0522/68/2022 दि.08/02/2022
2.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/0522/101/2023 दि.17/02/2023
3.सहा.आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल जा.क्र.विशा-4/खाचौ/सी.आर./101/2024 दि.12/10/2023
3.मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील आदेश क्र.मशा/पूनस्था-2023/प्र.क्र.19 /ई-8 नाशिक रोड 03/04/2024
4.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 नियम 03(5)
5.महाराष्ट्र राज्य सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.निप्रआ-1112/प्र.क्र.82/11-अ दि.20/04/2013

श्री.निवृत्ती शंकर घोडे, सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर, येथे कार्यरत असताना त्यांना आदीवासी विकास संस्थेमध्ये अपहार केले प्रकरणी पोलीस स्टेशन संगमनेर येथे गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आलेली असले कारणाने त्यांना अटकेचे दिनांक 15/01/2022 पासून जिल्हा परिषद सेवेतून तात्पुरते दूर करण्यात आलेले आहे व मुख्यालय कोपरगाव ठेवण्यात आलेले आहे.

प्रकरणी श्री.निवृत्ती शंकर घोडे, सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करणेकरिता संदर्भ क्रमांक 02 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत विभागीय चौकशी करणेत आलेली असुन प्रकरणी दि.12/10/2023 रोजी निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.करिता सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ असलेने न्यायालयीन निकालानंतर निर्णय घेणे संयुक्तीक राहील असे निष्कर्ष नोंदविलेले आहे मात्र अदयाप न्यायालयीन प्रकरणी निर्णय प्रलबिंत आहे. श्री.निवृत्ती शंकर घोडे यांचा निलंबन कालावधी एक वर्षापेक्षा अधिक झालेला असले कारणाने सदर प्रकरणी मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे निलंबन आढावा समितीकडे संदर्भ क्रमांक अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रकरणी विभागीय आयुक्त यांचे केलेली आहे.करिता श्री.निवृत्ती शंकर घोडे, सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक यांना चौकशी अहवालाचे निष्कर्षानुसार होणाया शिस्तभंगाचे कारवाईचे अटीला अधिन राहुन पंचायत समिति लोणी ता.जामखेड .येथे पदवीधर शिक्षक (विज्ञान) या पदावर पुन:स्थापित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी. श्री.निवृत्ती शंकर घोडे ,सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे, अन्यथा निलबंन कालावधी वाढण्यास कर्मचारी स्वत: जबाबदार राहील. तसेच सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक 20240715160109 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 15-07-2024 16:13:43

आशिष येरेकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.निवृत्ती शंकर घोडे ,सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर
द्वारा व प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर जि.अहमदनगर

2/- सदर आदेश श्री.निवृत्ती शंकर घोडे ,सेवा निलंबीत पदवीधर शिक्षक, जि.प.प्राथ.शाळा कोंची ता.संगमनेर जि.अहमदनगर यांना बजाविण्यात येऊन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.